रविवार दि.१ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३६२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# विरोधकांना माझा राजीनामा मागितल्या शिवाय अन्न पचत नाही:देवेंद्र फडणवीस

## पोलिस पाटील गावचे गृहमंत्री असल्याचा दावा



लोकनेता न्यूज नेटवर्क

नागपूर (वृत्तसंस्था)

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पुन्हा एकदा आपला राजीनामा मागणाऱ्या विरोधी पक्षांवर निशाणा साधला. विरोधकांना माझा राजीनामा मागितल्याशिवाय अन्नच पचत नाही. त्यामुळे ते दररोज सकाळी कॅमेऱ्यापुढे येऊन माझा राजीनामा मागतात. कदाचित एखाद्या दिवशी माझा राजीनामा मागितला नाही, तर त्यांना अन्नही पचत नसेल, असे ते म्हणाले.

राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे पोलिस पाटील संघटनेशी संवाद साधला. देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी राज्याचा गृहमंत्री आहे मात्र पोलीस पाटील हे त्यांच्या त्यांच्या गावाचे गृहमंत्रीच आहात हे विसरु नका. खरं म्हणजे गृहमंत्री म्हणून काम करताना शिव्याच जास्त खाव्या लागतात. यावेळी बोलताना त्यांनी विरोधकांना टोला लगावला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, खरे म्हणजे गृहमंत्री म्हणून काम करताना शिव्याच जास्त खाव्या लागतात. काही लोकांचा शौक असा आहे की सकाळी उठून कॅमेऱ्यापुढे येऊन माझा राजीनामा मागितल्याशिवाय त्यांना अन्नच पचत नाही. एखाद्या दिवशी माझा राजीनामा मागितला नाही तर त्यांना अपचन होते. पण पोलीस पाटील संघटना अशी आहे की ज्यांनी मागे लागून त्यांचे काम करुन घेतले. पण कुणी काम केले ते ही संघटना विसरली नाही. आज मला इथे बोलवून माझा सत्कार केलात त्याबद्दल आपले आभार मानतो.देवेंद्र फडणवीस म्हणाले, मानाच्या पदाला सन्मान मिळणे आवश्यक असते. काळाच्या ओघात व्यवस्था बदलली, लोकशाहीत अनेक संस्था तयार झाल्या. मानाच्या पदाचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न चालला आहे का? अशी शंका उपस्थित होते. मला पोलीस पाटील संघटनेचे लोक भेटायचे तेव्हा मला ते सांगायचे आम्हाला हिणवले जाते, बिन पगारी फुल अधिकारी. मी त्यांना सांगीतले काळजी करु नका, फुल पगारी आणि फुल अधिकारी असाच दर्जा आम्ही तुम्हाला देणार आहोत.देवेंद्र फडणवीस म्हणाले, संघटनेचे लोक मला भेटले तेव्हा मी चंग बांधला, मानाच्या पदाला आम्ही १५ हजार रुपये मानधन केले. तुम्ही काळजी करु नका, दोन तीन दिवसांपूर्वी सांगितले असते तर मी पैसे खात्यात जमा करुनच आलो असतो. सोमवारी जी. आर. निघून पैसे खात्यात गेले पाहिजेत, असा आदेश मी दिला आहे. चार महिन्यांचे पैसे खात्यात जातील आणि दर महिन्याला योग्य प्रकारे तुमच्या खात्यात येतील.

# शहिद चौकात, शहिद जवान लान्स नायक अजित वाल्हेकर यांच्या २३ व्या स्मृती दिना निमित्त मानवंदना

## स्मृती दिना निमित्त शालेय स्तरावर विविध कार्यक्रम संपन्न






लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथे ३१ ऑगस्ट २०२४ शनिवार रोजी शहिद लान्स नायक अजित वाल्हेकर यांच्या स्मृती दिना निमित्त मांजरसुंबा रोड वरील शाहिद चौक येथे मानवंदना देण्यात आली. तसेच स्मृती दिना निमित्त शहिद जवान लान्स नायक अजित वाल्हेकर सेवाभावी संस्था पाटोदा यांच्या वतीने वीर एकलव्य आदिवासी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय पाटोदा येथे शालेय नियोजन व आहाराचे नियोजन करण्यात आले होते. या वेळी पाटोदा नगर पंचायतचे सभापती किशोर अडागळे, हनुमंत काळे, नगरसेवक नय्युम भाई पठाण, सुनिल वाघमारे व आजी माजी सैनिक खंडू जाधव, ढेरे साहेब, परमेश्वर गर्जे, शहादेव पवार, मारुती पवार, नवनाथ शिंदे, सागर तुपे, हजारे साहेब, आप्पा राऊत यांच्या सह मित्र परिवार अक्षय वीर, ऋषिकेश इंगोले, अजिंक्य जाधव, प्रशांत जाधव, निखिल सरगर, विजय शिंदे, सुमित कुटे, रोहन वीर, गणेश पाटोळे, सुजित अडागळे, ऋषिकेश वीर, विशाल घाडगे, सुरज मुळीक, यश चव्हाण, विवेक गवळी, कृष्णा गवळी यांची उपस्थिती होती.

# अखेर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्यांच्या पाठपुराव्याला यश



लोकनेता न्यूज नेटवर्क

अकोला । पुजा जायभाये

पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला समोरून जात असलेल्या शिवनी ते अकोला या मार्गाचे मागील दोन वर्षांपूर्वी चौपदरीकरण करण्यात आले. या चौपदरीकरणामुळे फायदा तर होत होता परंतु डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसरातून वाहने भरगाव वेगाने जातात आणि विद्यापीठ परिसरात कुठेही गतिरोधकचे बोर्ड लावलेले नव्हते वेगाने जाणाऱ्या वाहनामुळे वारंवार छोटे मोठे अपघात होत होते. विद्यापीठ परिसरातील सर्व महत्त्वाच्या प्रवेशद्वारा जवळ गतिरोधक लावल्यास अपघात तसेच जीवित हानी टाळता येईल. या अनुषंगाने अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्यांनी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री मा. नितीनजी गडकरी यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत निवेदन सादर केले. विद्यार्थ्यांची मागणी होती की विद्यापीठ परिसरात जाऱ्या येन्याच्या दोन्ही मार्गावर विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ (महाबिज प्रवेश द्वार, कृषि महाविद्यालय प्रवेश द्वार, डॉ पं दे कृ वि कर्मचारी वसाहत प्रवेशद्वार, स्टेट बँक ऑफ़ इंडिया जवळ नागार्जुन उद्यान प्रवेशद्वार, कुलगुरु निवास, पशुसंवर्धन विभाग, विद्यापीठ प्रवेशद्वार, विद्यापीठ अभियंता कार्यालय जवळ) या ठिकानी गती रोधक लावण्यात यावे अशी विनंती विद्यार्थ्यांनी केली. दिलेल्या निवेदनाची दखल घेण्यात यावी यासाठी प्रा. नितीन गुप्ता (विदर्भ प्रांत अध्यक्ष), श्री. सुहास मोरे (अकोला जिल्हा संय्योजक) व अन्य विद्यार्थि कार्यकर्त्यांनी विशेष लक्ष घातले आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठ परिसरात गतिरोधक बनविण्यात आले, आणि हे शक्य झालं ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्यांमुळे. अपघातांच्या वाढत्या प्रमाणावर आळा घालण्यासाठी विद्यार्थ्यांनी उचललेलं हे पाऊल नक्कीच कौतुकास्पद आहे.

# व्यक्तिमत्व विकासात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व-प्रा.डॉ.मोरे




लोकनेता न्यूज नेटवर्क

सोनपेठ । प्रतिनिधी

येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ शनिवार रोजी अतिथी व्याख्यान संपन्न झाले. शिवाजी महाविद्यालय रेणापूर जि.लातूर येथील इंग्रजी विभागाच्या प्रा.डॉ.क्रांती मोरे यांचे भाषा, कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते सर उपस्थित होते. व्याख्यानाच्या प्रास्ताविकात प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी अतिथी प्रा.डॉ.क्रांती मोरे यांचा परिचय करून देतांना आपल्या सर्वांच्या सर्वांगीण विकासामध्ये भाषा, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास हे कसे महत्त्वाचे आहे(?) याचा थोडक्यात आढावा घेतला. व्याख्यानात सविस्तर बोलताना क्रांती मोरे म्हणाल्या, भाषा, व्यक्तिमत्व विकास आणि कौशल्य हे एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत. सर्वार्थाने माणसाला स्वतःला सिद्ध करायचे असेल तर बदलत्या काळामध्ये अनेक भाषा शिकून पारंगत होत विविध कौशल्य आत्मसात करतांना आपल्या व्यक्तिमत्त्वाला फुलवावे लागणार आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० चे बदलते आव्हान स्वीकारताना आपल्याला चारित्र्य, वर्तन आणि दृष्टिकोन इत्यादी महत्वपूर्ण बाबी सोबत ठेवून काळाबरोबर बदलावे लागणार आहे. असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.वसंत सातपुते सरांनी महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या एकूण सर्वच कार्यक्रमांवर प्रकाश टाकला. इंग्रजी विभाग हा सातत्याने नवे नवे उपक्रम घेणारा विभाग म्हणून गौरवोद्गार काढले! ह्या अतिथी व्याख्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दिलीपकुमार कोरडे यांनी केले तर आभार बीए तृतीय वर्षाचा विद्यार्थी रवि राठोड याने मानले. या व्याख्यानाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दौंड मधील जिल्हास्तरीय अधिवेशनाला माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची गैरहजेरी

## बावड्याचे पाटील लवकरच तुतारी हाती घेणार? चर्चेला आले उधाण





लोकनेता न्यूज नेटवर्क

दौंड । बबनराव धायतोंडे

पुणे जिल्हा भाजपच्या दौंड मधील अधिवेशनाला हर्षवर्धन पाटील यांनी गैरहजेरी लावली आहे. या कार्यक्रमाला भाजपचे पुणे जिल्हा अध्यक्ष वासुदेव काळे यांनी निमंत्रण दिले होते. मात्र तरीही हर्षवर्धन पाटील गैरहजर राहिल्याने वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत.यावर भाजपाचे पुणे जिल्हा अध्यक्ष वासुदेव काळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

हर्षवर्धन पाटील हे भारतीय जनता पार्टीचे नेते आहेत.त्यांना मी स्वतः इंदापूर मधील त्यांच्या निवासस्थानी जाऊन या कार्यक्रमाचे निमंत्रण दिलं होतं.कोणाला या कार्यक्रमाला येता आलं नाही तर ते आपल्याला कळवतात परंतु हर्षवर्धन पाटील यांची अनुपस्थिती आज का आहे हे मी त्यांच्याशी बोलून कळवेल,मात्र अद्याप तरी हर्षवर्धन पाटील यांच्याकडून अनुपस्थित राहण्याचं कारण मला समजलं नसल्याचं जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे यांनी म्हटल आहे. भारतीय जनता पार्टी पुणे ग्रामीण दक्षिण विभागाचं जिल्हास्तरीय अधिवेशन पुण्याच्या दौंड मध्ये आज पार पडले.या जिल्हा अधिवेशनाचे भाजपचे नेते हर्षवर्धन पाटील यांना निमंत्रण होतं. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे यांनी स्वतः हर्षवर्धन पाटील यांच्या भाग्यश्री बंगलो या ठिकाणी उपस्थिती लावत हर्षवर्धन पाटील यांना या कार्यक्रमाचे निमंत्रण दिलं होतं,मात्र असं असतानाही हर्षवर्धन पाटील यांनी या जिल्हा अधिवेशनाला दांडी मारल्याने राजकीय वर्तुळात बावड्याचे पाटील विधानसभेला हाती तुतारी घेणार अशा चर्चेला उधान आले आहे.



झाडे लावा झाडे जगवा

## चारोळी

चिंब पावसापरी
मनही थोडं भिजतं
पाकळी होऊन फुलात ते
अल्लड होऊनी निजतं.

रंजना सानप
मायणी (सातारा)


# पुढील काही दिवसात पावसाचा जोर वाढणार

लोकनेता न्यूज नेटवर्क । पुणे (वृत्तसंस्था)

बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता आता वाढली आहे. त्यामुळे राज्यात बहुतांश भागात पुढील काही दिवसात पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाच्या वतीने वर्तवण्यात आला आहे. त्याचबरोबर तीन ते पाच सप्टेंबर दरम्यान राज्यातील विदर्भ, मराठवाडा आदी भागांमध्ये मेघगर्जना आणि विजांच्या कडकटांसह पाऊस होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.बंगालच्या उपसागरामध्ये तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याच्या क्षेत्राची तीव्रता आणखी वाढली आहे. त्यामुळे राज्यातील बहुतांश भागांमध्ये तीन ते पाच सप्टेंबर या कालावधीत पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे

# मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा कोसळल्याने सुकळी येथील शिवप्रेमींनी निषेध व्यक्त करत शिवरायांना केला दूध अभिषेक





लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

सेनगाव तालुक्यातील सुकळी ( बुद्रुक) येथे शिवप्रेमी कडून मालवण येथे झालेल्या घटनेच्या निषेधार्थ घोषणाबाजी करण्यात आली व छत्रपती शिवरायांचा दूध अभिषेक करण्यात आला यावेळी सुकळी ग्रामपंचायत कार्यालयाच्या समोर शिवप्रेमी कडून मालवण येथे झालेल्या निषेधार्थ नाराजी व्यक्त करत या जागेवर परत नव्याने छत्रपती शिवरायांचा पुतळा उभरावा अशी मागणी केली यावेळी उपस्थित सतीश पाचपिल्ले ,प्रकाश कऱ्हाळे, शंकर कऱ्हाळे, गजानन गव्हाणे, रामेश्वर जाधव, सुरेश पाचपिल्ले, देवराव कऱ्हाळे, रोहन बरडे, विजय शिंदे, विनायक पाचपिल्ले, वैभव कऱ्हाळे, विष्णू कऱ्हाळे, गजानन पाचपिल्ले, यांच्यासह आदी शिवप्रेमी उपस्थित होते,

# महिलांचा प्रचंड उत्साहात प्रतिसाद;सौ.शितल भोसले यांनी ११ हजाराची तर सौ.स्नेहल होले यांनी जिंकली ७५०० रुपयांची पैठणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



आष्टी येथे कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या खेळ पैठणीच्या कार्यक्रमात सौ. शितल सतिष भोसले यांनी ११ हजार रुपयांची बांगडी मोर पैठणी जिंकली तर सौ. स्नेहल संदिप होले यांनी ७५०० रुपयांची काली चंद्रकला पैठणी पटकावली आणि सौ. मोनाली किरण शिंदे यांनी ५ हजार रुपयांची पेशवाई पैठणी पटकावली.खेळ पैठणीचा कार्यक्रमास आष्टी तालुक्यातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या उपस्थित महिलांमध्ये प्रचंड होता कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्षात २०० ते २५० महिलांनी सहभाग नोंदवला.

याबाबत अधिक माहिती अशी की ,आष्टी येथे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसऱ्या कृषी प्रदर्शनामध्ये स्वागत अध्यक्ष डॉ. अजयदादा धोंडे यांच्या संकल्पनेतून खेळ पैठणीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन सौ.दमयंतीताई धोंडे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले.याप्रसंगी सौ.अक्षदा अजय धोंडे, सौ. सविता राजेश धोंडे उपस्थित होत्या. सिने पत्रकार भगवान राऊत यांच्या संकल्पनेतून खास महिला व माता-भगिनींसाठी बी. आर.इव्हेंट्स प्रस्तुत खेळ पैठणीचा,सोहळा आनंदाचा हा निवेदक उद्धव के. पी. यांनी सादर केलेला धमाल मनोरंजक कार्यक्रम झाला.महिलांसाठी मनोरंजक खेळ,गप्पा,गाणी, उखाणे,नृत्य,नाट्य, संगीता बरोबरच मनोरंजनातून प्रबोधन करणारे किस्से व कार्यक्रम सादर करण्यात आले. खेळ पैठणीच्या कार्यक्रमात सौ. सुनिता सुद्रुक यांनी ज्युसर हे बक्षिस पटकावले,डॉ. सौ. स्मिता एकनाथ हजारे यांनी कुरडया करण्याचा सोर्या मिळविला, सौ.अर्चना शेवाळे यांना ड्राय फ्रुट सेट मिळाला,सौ. वैशाली सुभाष जाधव व मिनाज अफजल शेख यांना प्रत्येकी पोळी ठेवण्याचा डबा हे बक्षिस मिळाले.सौ.उषा भारत केरूळकर यांना लेमन सेट व सौ.शेख भाभी यांना पर्स हे बक्षिस मिळाले.खेळ पैठणीच्या संपूर्ण कार्यक्रमाचा माजी आमदार भीमराव धोंडे,जेष्ठ नेते विठ्ठलराव बनसोडे,भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे,अभयराजे धोंडे,दिलीपराव काळे,भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख, प्रशासकीय अधिकारी डॉ.डी. बी.राऊत,प्राचार्य श्रीराम आरसुळ,बाबु कदम तसेच आष्टीतील पत्रकार बांधव तसेच महिला व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन आस्वाद घेतला.भाजपाचे आष्टी शहराध्यक्ष बाबु कदम व कु. भक्ती गणेश गिरी या नववीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीने माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या जीवनावर कविता सादर करून उपस्थितीने जिंकली.दोघांनाही उपस्थितांनी रोख स्वरूपात बक्षिस देऊन कौतुक केले.

# केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व योजना सर्व कार्यकर्त्यांनी तळागाळापर्यंत पोहोचवा-ना.खडसे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**





केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व योजना भाजपाचे नेते,पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तळागाळापर्यंत पोहोचवून लोक संपर्क वाढवला तर येणाऱ्या निवडणुकीत पक्षाला निश्चितच घवघवीत यश मिळेल,असे प्रतिपादन केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री ना. रक्षाताई खडसे यांनी श्रीगोंदा येथे भाजपाच्या श्रीगोंदा - नगर विधानसभा मतदार संघाच्या आढावा बैठकीत बोलताना केले.

ना.खडसे पुढे म्हणाल्या राज्यात आपल्याला पुन्हा सत्ता मिळवायची आहे सरकारने अनेक कल्याणकारी योजना आणल्या व राबविल्या आपण याचा सातत्याने पाठपुरावा करावा. श्रीगोंदा मतदार संघात संघटना मजबूत आहे आमदार बबनराव पाचपुते यांचे काम देखील उल्लेखनीय आहे,पण अती आत्मविश्वास नको तर कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन काम करावे.यावेळी बोलताना आमदार बबनराव पाचपुते म्हणाले मतदार संघात पाण्यापासून सर्व प्रश्न सोडवताना आपण सामाजिक बांधिलकीतून सर्व कामे केली आहेत.तसेच लोकसभा निवडणुकीच्या वेळी वेगळी परिस्थिती होती त्यामुळे मताधिक्य घटले पण विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विक्रम पाचपुते व भाजपा पदाधिकारी,कार्यकर्ते सर्व बाबींवर बारीक लक्ष ठेऊन आहेत.त्यामुळे मतदार नक्कीच पुन्हा संधी देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी विक्रम पाचपुते यांनी प्रास्ताविक करून केलेल्या कामांचा आढावा दिला.तसेच कार्यकर्त्यांनी ना.खडसे यांच्याकडे महायुतीच्या घटक पक्षातील जबाबदार नेते व कार्यकर्त्यांनी लोकसभा निवडणुकीत महायुती उमेदवाराचा प्रचार केला नसल्याचे निदर्शनास आणून दिले.त्यावर ना.खडसे यांनी याचा अहवाल वरिष्ठांना पाठवणार असल्याचे स्पष्ट केले.यावेळी श्रीगोंदा नगरपालिकेचे माजी नगरसेवक शब्बीरभाई बेपारी व सहकाऱ्यांनी तसेच विविध गावातील कार्यकर्त्यांनी भाजपा मध्ये प्रवेश केला.पत्रकारांशी बोलताना ना.रक्षाताई खडसे म्हणाल्या, आपल्यावर नगर जिल्ह्यातील ६ विधानसभा मतदार संघाची जबाबदारी दिली असून आज आपण ३ मतदार संघात आढावा बैठक घेतली आहे.श्रीगोंदा मतदार संघात आ.पाचपुते यांच्यामुळे पक्षाचे संघटन मजबूत असल्याचा पुनरुचार त्यांनी केला. तसेच आ.पाचपुते यांच्या दूरदृष्टीने अनेक कामे मार्गी लागून कोट्यावधी रुपयांचा निधी प्रत्येक गावाला प्राप्त झाल्याने येणाऱ्या निवडणुकीत पक्षाला निश्चितच यश मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी मा.जिल्हा परिषद सदस्या डॉ.सौ.प्रतिभाताई पाचपुते,दिनूकाका पंधरकर, गणपत दादा काकडे ,पोपटराव खेतमाळीस, प्रतापसिंह पाचपुते, बाळासाहेब महाडिक , संदीप नागवडे, बापू तात्या गोरे, पुरुषोत्तम भैया लगड, मिलिंद दरेकर ,धनराज कोथिंबिरे,मंगेश घोडके,शुभांगीताई सप्रे,देवयानी शिंदे,सुजाता खेडकर,विद्या शिंदे, उषाताई कर्डिले तसेच सर्व माजी नगरसेवक,भाजपाचे सर्व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते,महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> **पक्षाने आपल्याला योजना तळागाळापर्यंत पोहोचल्या की नाही तसेच पक्षीय संघटन कसे आहे व निवडणुक जिंकण्यासाठी काय उणीवा आहेत याचा आढावा घेण्यासाठी पाठवले असल्याचे सांगितले.तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी विरोधकांनी आस्थेच्या बाबतीत राजकारण आणू नये असे आवाहन करून सरकार याबाबत गांभीर्याने चौकशी करत आहे असे स्पष्ट केले.**

# आईने किडनी देत लेकीस दिला पुनर्जन्म भाऊ भावजयीचा त्याग समाजापुढे आदर्श

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

आईच्या प्रेमाची व उपकाराची महती कितीही वर्णन केली तर ती संपत नाही . एका साठ वर्षीय आईने मुलीस किडनी दान देत पुनर्जन्म दिला.यामुळे आईच्या आफाट मातृत्व व वात्सल्याचा प्रत्येय आला आहे .

नावंदी येथील आई धोंडाबाई अशोक हुजिरशिक्के यांनी आपली मुलगी सौ रेखा हनुमंत लांडगे यांना किडनी देत आपल्या मुलीस पुनर्जन्म दिला आहे.धोंडाबाई व आशोक हुजिरशिक्के यांची मुलगी रेखा हनुमंत लांडगे यांचा विवाह बनवस तालुका पालम येथील हनुमंत लांडगे यांच्याशी झाला. रेखाबाई यांना १८ वर्षीय मुलगा आहे. रेखाबाई आपल्या सासरी आनंदात जीवन जगत असतानाच मागील दोन वर्षांपूर्वी दोन्ही किडनी काम करीत नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले दरम्यान सुरेखा हनुमंत लांडगे यांच्यावर अनेक रुग्णालयातून किडनीच्या आजारासाठी उपचार घेतला परंतु दोन्ही किडनी निकामी झाल्याने रेखाबाई यांची तबियत खालावत होती. लेकीची खालावत



असलेली तबियत पाहुन आई धोंडाबाई यांनी आपल्या मुलीस स्वतःची किडनी देण्याचा निश्चय केला. व संभाजी नगर येथील एका रुग्णालयात दोघींच्या चाचण्या झाल्यानंतर आई धोंडाबाई अशोक हुजूरशिक्के यांची किडनी मुलगी सुरेखा हनुमंत लांडगे यांना देण्याचा देण्याचे ठरले व संभाजी नगर येथिल रुग्णालयात किडनी दिली . ऑंपरेशन सक्सेस झाले आईच्या आपार मातृत्वामुळे लेकीला पुनर्जन्म मिळाला. आता माय लेक दोघीचींही तबियत चांगली आहे.

### भाऊ भावजयीचा त्याग कामी

**आई धोंडाबाई यांच्या त्याग व वात्सल्या सोबतच बहिणीच्या उपचारासाठी भाऊ विनोद पाटील व भावजय सौ.वर्षा पाटील यांनी मोठी जिम्मेदारी पार पाडली त्या बद्दल करावे तितके कौतूक कमीच आहे. मागील दोन वर्षापासुन विनोद पाटील बहिणीच्या उपचारासाठी दवाखान्यात जात असताना घर सांभाळण्याचे काम करणे, किडनी प्रत्यारोपण काळात घरची ,शेतातील कामे करत आर्थिक जमवाजमव करणे, सासु नंनदेचे मनोधैर्य वाढवणे,या कार्यामुळे आजच्या काळातही वहिणी व ननंदेच्या उपचारासाठी असा भाऊ विनोद व भावजय वर्षा पाटील यांचा त्याग समाजासाठी एक आदर्शच आहे.आईचे आपार वात्सल्या तरध सागरापेक्षा मोठे आहेच परंतू भाऊ व भावजय यांनी माहेर कसे असावे याचा आदर्श निर्माण केला आहे.**



**अवघ्या पाच महिन्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट सोडून भाजपमध्ये गेलेल्या देहेड ता भोकरदन येथील सरपंच वेणूबाई भाऊराव निकाळजे ह्या पुन्हा माननीय चंद्रकांत अण्णा दानवे पाटील यांच्यावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार गटांमध्ये प्रवेश करण्यात आला असून भाजपा च्या ताब्यात असलेली ग्रामपंचयत वर पुन्हा राष्ट्रवादी चा ताबा**

## मोगरा



मन तुझं ग मोगरा
परीमळ ग सुवासी
सुगंधात वाहि वारा
संगे जगलीस त्याशी ।।१।।

जसा मोगरा सहवास
तूच माझ्या ग जीवनी
तु प्रेमाचा भक्तिरस
तूच सुगंधी कहानी ।।२।।

आपुल्या रेशीमगाठी
असाव्या मोगऱ्यासम
मनोमिलनाच्या भेटी
उजळाव्या दिव्यासम ।।३।।

महिमा वर्णावा कीती
तुझ्या ग् प्रेमरसाचा
झाले जगण्याचे मोती
अतुट तुझिया विश्वासाचा ।।४।।

मोगरा सांगतो जगी
सदा वागा माझ्या परी
राहावी आनंदी सुगी
संपूर्नी वादाची दरी. ।।५।।

**कवी:- संतोष लक्ष्मीबाई दौलतराव कदम. शेकापुरकर**

# श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय किन्होळा येथे शिक्षक पालक सभा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चिखली । ज्ञानेश्वर बुधवत**



दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय किन्होळा येथे शिक्षक पालक सभा पार पडली आजच्या पालक सभेला आज पर्यंत मी हजर राहिलेल्या पालकसभांपैकी सर्वात जास्त पालक हजर त्याबद्दल त्या त्याबद्दल पालकांचे प्राचार्य राजेश्वर सुसर यांनी आभार मानलेसर्वांचे हार्दिक हार्दिक आभार पालकांनी शाळेच्या प्रगती विषयी समाधान व्यक्त केले किमान शंभर पालकांपैकी एकांनीही कोणत्याही प्रकारची तक्रार व्यक्त केली नाही उलट समाधान व्यक्त केले.

पालक मेळाव्यामध्ये पालकांनी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यासाठी संस्थेला विनंती केली विद्यालयामध्ये पाचवी, सहावी आठवी,नववी,सेमी इंग्रजी सुरू केल्याबद्दल सर्व पालकांनी आभार व्यक्त केले किमान दर दोन महिन्यांनी पालक मेळावा घ्यावा ही पालकांची मागणी मुख्याध्यापकांनी मान्य केली सभेमध्ये मुलींच्या सुरक्षिततेविषयी चर्चा करण्यात आली आणि पालकांना सूचना करण्यात आल्यात, मुलींना ई लर्निंग क्लास मध्ये स्वतंत्र बसवून गुड टच, बॅड टच, व आपल्यास कोणत्याही प्रकारचा त्रास झाल्यास तक्रार पेटीमध्ये तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले, पालक मेळावा सुरू होण्यापूर्वी, महिला पालकांची, महिला तक्रार निवारण समितीची सभा घेऊन, महिला पालकांना आवाहन करण्यात आले, की मुलींच्या तक्रारीकडे दुर्लक्ष न करता डायरेक्ट प्राचार्यांशी संपर्क करून आपली तक्रार नोंदवण्यात यावी, मुलींच्या संदर्भामध्ये कोणतीही तक्रार आल्यास शालाबाह्य मुलांचा त्रास होत असल्यास डायरेक्ट पोलीस स्टेशनला रिपोर्ट देण्यात येईल याचे आश्वासन प्राचार्य राजेश्वर सुसर यांनी दिले, यानंतर सुट्टीच्या दिवशी किंवा शाळा सुटल्यानंतर कोणत्याही प्रकारचे विद्यार्थी विद्यालयाच्या प्रांगणामध्ये खेळायला येणार नाही,याचे आश्वासन दिले, कारण शाळेच्या सुट्टीच्या दिवशी खेळायला येणारे विद्यार्थी हे शाळेच्या जुन्या स्वच्छतागृहाला नुकसान पोहोचवत आहेत, त्याची व्हिडिओ शूटिंग सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये झालेली आहे, अशा विक्षिप्त मुलांना शाळेमध्ये सुट्टीच्या दिवशी खेळण्यासाठी निर्बंध घालण्यात येत आहे, श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय किन्होळ्याच्या प्रांगणामध्ये यानंतर कोणत्याही प्रकारचा खेळ खेळण्यासाठी गावातील मुलांनी येऊ नये, आणि ते येणार नाहीत असे आश्वासन पालक सभेमध्ये पालकांना देण्यात आले यानंतर कोणीही मुख्याध्यापकांच्या परवानगीशिवाय शाळेमध्ये खेळण्यासाठी प्रवेश करू नये, मुलांमध्ये खेळ भावना जोपासण्यासाठी मुख्याध्यापकांनी केवळ शाळेच्या मुलांना सुट्टीच्या दिवशी शाळेमध्ये खेळण्याची परवानगी दिलेली होती परंतु त्यांच्यासोबत गावातील काही मुले खेळण्यासाठी येत होती, परंतु आज पासून कोणत्याही प्रकारचा रोड रोमिओ शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणामध्ये आढळल्यास त्याला डायरेक्ट पोलिसांच्या हवाले केल्या जाईल, याची गांभीर्याने दखल घ्यावी असे आवाहन सुट्टीच्या दिवशी, गावातील खेळायला येणाऱ्या, रिकाम्या मुलांना प्राचार्य राजेश्वर सुसर यांनी केले, कार्यक्रमाचे संचालन श्री हिंगे सर यांनी तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षक श्री श्री एस एस पडघान सर यांनी केले सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# शिवछत्र मित्र मंडळाच्या वतीने आठवड्यात एक दिवस जनता दरबार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

मागील ३० वर्षा पासून लोणार शहरात कार्यरत असलेली सामाजिक संघटना शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांच्या संकल्पनेतून जनता दरबाराच्या माध्यमातुन आठवड्यातून एक दिवस सर्वसामन्याना आपले प्रश्न मांडण्याची संधी मिळणार आहे.



आठवड्यातील दर गुरुवारी श्री टॉकीज येथील शिवछत्र मित्र मंडळाच्या कार्यलयात जनता दरबाराच्या माध्यमातुन गोरगरीब जनतेच्या, शेतकरी, तसेच प्रत्येक नागरिकांच्या अडीअडचणी जाणून त्यांचे निराकरण करण्यात येणार आहे. अनेक शासकीय कार्यलयात सर्वसामान्य नागरिकांचे कामे मार्गी लागत नसल्याच्या तक्रारी शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांच्या कडे येत असल्यामुळे नागरिकांच्या अडिअडचणी सोडविण्यासाठी फक्त समाजकारण हा एकमेव उद्देश डोळ्या समोर ठेऊन या जनता दरबाराचे आयोजण करण्यात आले आहे. ज्या काही समस्या असतील त्या जनता दरबाराच्या माध्यमातून मार्गी लावल्या जाणार आहे. असे शिवछत्र मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी प्रसिद्दीपत्रका द्वारे काळविले आहे.

# भास्करराव देशमुख यांचा सेवापुर्ती कार्यगौरव सोहळा उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन : पंचायत समिती येथे स्थापत्य अभियंता या पदावर कार्यरत असलेले भास्कर दत्तात्रय देशमुख यांनी ३६ वर्ष सेवाभावी वृत्तीने कार्य, पंचायत समिती येथे कर्मनिष्ठेने व कर्तव्यदक्षतेने श्रेष्ठत्तम सेवा देत राहिलात आपले व्यक्तित्व म्हणजे काम हाच परमेश्वर. गरिबीतून संघर्षमय जीवन जगत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत विकास साधला. नियोजनबद्ध काम, सचोटी, मनमिळावू, कर्तृत्ववान अशी त्यांची गुणवैशिष्टे, एक आदर्श कुटुंब, सामाजिक व धार्मिक कार्य, इतरांना मार्गदर्शन करणे असे गौरमय उदगार पंचायत समिती भोकरदन येथील कर्मचाऱ्याच्या वतीने काढण्यात आले. यावेळी



जी.एस.सुरडकर गटविकास अधिकारी भोकरदन,भोसले मुख्याध्यापक बेलोरा, पीडब्ल्यू सोनवणे पंचायत समिती विस्तार अधिकारी भोकरदन, जगताप साहेब प्रशासन अधिकारी, संजय घुले, कैलास सोनवणे, ग्रामसेवक अध्यक्ष तायडे साहेब,ग्रामसेवक संदीप सपकाळ,बकाल भोकरदन पंचायत समिती सर्व कर्मचारी वर्गाची यावेळी उपस्थिती होती.फोटोमध्ये सत्कार करताना गटविकास अधिकारी यांच्या हस्ते भास्करराव लहाने सौ स्वर्णा लहाने.

# पारंपारिक पिकांचा नाद सोडून संकरित बीज उत्पादनापासून लाखो रुपये कमविणारा-संतोष गवारे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील लाठ (खु.) या गावचे तरुण शेतकरी संतोष गवारे हे इतर शेतकऱ्यांप्रमाणेच अगोदर कापूस,सोयाबीन आणि तूर, हळद अशा पारंपारिक पिकांची लागवड करत असत.परंतु या पिकांच्या व्यवस्थापनावर करावा लागणारा खर्च आणि हातात येणारे उत्पन्न यांचा ताळमेळ काही बसताना दिसत नव्हता.त्यामुळे शेती करावी परंतु वेगळे काहीतरी करावे, हा विचार त्यांच्या मनामध्ये सतत चालू होता,पिकपद्धतीत बदल करणे हे काळानुरूप गरजेचे आहे हे त्यांनी ओळखले,

म्हणून यात बद्दल करण्याच्या दृष्टिकोनातून पाऊल उचलताना त्यांनी अगोदर मोकळ्या शेतीत भाजीपाला घ्यायला सुरुवात केली.परंतु गेल्या कित्येक वर्षापासून अवकाळी पावसाचा किंवा इतर नैसर्गिक आपत्तीचा इतर शेतकऱ्यांना बराच फटका बसत आहे, तोच फटका भाजीपाला पिकांच्या बाबतीत संतोष यांना देखील बसला व यामुळे भाजीपाला पिकांचे देखील मोठे नुकसान झाले. अर्थात यासाठी टाकलेला पैसा वाया गेला व त्यांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागला.

पारंपारिक शेती पद्धती आणि पारंपारिक पिके यांच्या ऐवजी आता विविध प्रकारची फळपिके आणि भाजीपाला पिकांचे उत्पादन,औषधी वनस्पतींची लागवड तसेच रेशीम शेती व त्यासोबतच कुक्कुटपालन,शेळीपालन आणि पशुपालनासारख्या व्यवसायाला तंत्रज्ञानाची जोड देऊन व्यावसायिक दृष्टिकोनातून आज शेतात काय पिकते,त्यापेक्षा आज बाजारात काय विकते! हे अत्यंत महत्त्वाचे आहे, आणि त्या संकल्पनेतूनच केलेली प्रगती यामुळे शेती क्षेत्राचे स्वरूप पालटले जात आहे, त्यामुळे शेतकरी देखील आर्थिक समृद्धीच्या दिशेने आता वाटचाल करताना दिसून येत आहेत.

कुठल्याही गोष्टीत परिस्थितीनुसार किंवा काळानुसार बदल घडवणे हे विकासाच्या व आर्थिक बाबतीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे असते, शेती क्षेत्रामध्ये याच पद्धतीने बदल करताना सध्या दिसून येत असून हे दिलासादायक एक चित्र आहे. अगदी याच मुद्द्याला धरून आपल्याला कंधार तालुक्यात असलेल्या लाठ (खु.) या छोट्याशा गावचे तरुण शेतकरी संतोष गवारे यांचे उदाहरण घेता येईल. ज्वारी,कापूस,तुर आणि सोयाबीन सारख्या पिकांना फाटा देऊन ते सध्या आधुनिक पद्धतीने संकरित भाजीपाला बीजोत्पादन करीत आहेत, त्यात या उत्पादनाद्वारे शेतीच्या माध्यमातून चांगला आर्थिक नफा मिळवत आहेत.

शेवटी यामध्ये देखील बदल करण्याचे ठरवले आणि गेल्या चार वर्षापासून आधुनिक पद्धतीने संकरित



भाजीपाला उत्पादन करीत आहेत सिजेंटा मनसेंटा महेको आधी कंपन्यासोबत ही शेती करत असून त्यांना एकूण आठ शेडनेट मधून झुकीने मिरची टोमॅटो काकडी आदी भाजीपाला पिकांचे आधुनिक पद्धतीने बीज उत्पादन करीत आहे यामधून दरवर्षी लाखो रुपये उत्पन्न त्यांना मिळत आहे संतोष गवारे हे इतर शेतकऱ्यांनाही प्रेरित करून मार्गदर्शन करण्याचे कार्य करीत असून त्यांच्या प्रेरणेने लाट खुर्द व परिसरातील जवळपास ६० ते ७० या भाजीपाला बीज उत्पादनाकडे वळले आहेत, तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे गवारे हे आदर्श शेतकरी झाले आहेत. लाठ खुर्द हे शेडनेटचे गाव म्हणून प्रसिद्ध झाले असून येथील शेतकरी दरवर्षी कोठे उद्याची उलाढाल करीत आहेत आणि गवारे यांचे मार्गदर्शनाखाली कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र सगरोळी, सिजेंटा,मनसेंटा सह इतर कंपन्या यांचे सहकार्य व मार्गदर्शन यामुळे गवारे आणि इंगोले या आदर्श शेतकरी जोड गोळीने आज हे छोटेसे लाठ (खू.)गाव नांदेड जिल्ह्याच्या नकाशावर आल्याचे दिसून येत आहे.यामध्ये त्यांना जिल्हा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, व कृषी विज्ञान केंद्र सगरोळी,यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

संस्कृती संवर्धन मंडळ संचलित कृषी विज्ञान केंद्र सगरोळीने त्यांचा वेळोवेळी सन्मान केल्याने त्यांची प्रेरणा इतरही शेतकऱ्यांना मिळाली आहे, संतोष गवारे व इंगोले यांच्या आधुनिक पद्धतीने शेडनेटमध्ये संकरित विविध भाजीपाला पिकांचे बीज उत्पादन करत असल्यामुळे विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, कृषी आयुक्त धीरजकुमार, तात्कालीन जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविशंकर चळवदे, तत्कालीन तालुका कृषी अधिकारी रमेश देशमुख, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक राजेश धुर्वे, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉक्टर सुरेश कुलकर्णी यांनी लाठ(खु.) येथे भेट देऊन संतोष गवारे,इंगोले यांच्यासह त्यांच्या इतर सहकारी शेतकऱ्यांच्या शेडनेट मधील संकरित भाजीपाला बीज उत्पादन शेतीची पाहणी करून शुभेच्छा देऊन सन्मानित केले. यामध्ये गवारे यांनी शेतीमध्ये बदल केलाच व या करिता आर्थिक मदत मिळावी म्हणून नाबार्ड सारखा योजनांचा कौशल्याने वापर केला, शेतीमधून नवनवीन भाजीपाला पिकाच्या बीज उत्पादन व्यवसायास चालना देत आर्थिक समृद्धी कशी साधता येते याची प्रेरणाच इतर शेतकऱ्यांना घालून दिली.आणि आपल्यासह आपल्या इतर सहकारी शेतकऱ्यांना वर्षाकाठी लाखो रुपये या संकरित भाजीपाला बीज उत्पादनांमधून कमाई करून देत असल्याने संतोष गवारे यांनी भाजीपाला बीज उत्पादन व्यवसायाला भरभराटी आणून दिली आणि त्यातून आर्थिक फायदा करून दिला त्यामुळे संतोष गवारे यांचे परिसरामध्ये एक आदर्श तरुण शेतकरी म्हणून नाव घेतले जात आहे,

## निराधारांचा आधार होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार-प्रा.डॉ.विनोद जगतकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

महाराष्ट्र शासनाच्या परळी तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अशासकीय सदस्यपदी प्रा. डॉ. विनोद जगतकर यांची निवड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाचे नेते, परळी येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय येथील इतिहास विभाग प्रमुख, पालकमंत्री तथा कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे खंदे समर्थक प्रा. डॉ.विनोद गणपतराव जगतकर यांची संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अशासकीय सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.या माध्यमातून परळी तालुक्यातील असंख्य निराधार लोकांचा आधार होण्याची संधी त्यांना पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली



मिळणार आहे. त्यांच्या या निवडीमुळे परळी तालुका व पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून त्यांचे स्वागत व अभिनंदन होत आहे.परळी तालुक्यातील प्रत्येक निराधारां पर्यंत ही योजना पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी करेल असे त्यांनी आमच्याशी बोलताना मनोगत व्यक्त केले. ही संधी आपणास दिल्याबद्दल पालकमंत्री धनंजय मुंडे व वाल्मीक अण्णा कराड यांचे त्यांनी विशेष आभार मानले आहेत.

## तानाजी सावंतांना 'राष्ट्रवादी' विधान भोवणार?

लोकनेता न्यूज नेटवर्क । **मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना उपमुख्यमंत्री अजित पवार व त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसविषयी वादग्रस्त विधान करणे चांगलेच भोवण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीने या प्रकरणी तीव्र हरकत नोंदवल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी त्यांना तातडीने भेटण्यासाठी मुंबईला बोलावले आहे. या भेटीत शिंदे हे तानाजी सावंत यांच्याकडे त्यांच्या वादग्रस्त विधानांविषयी स्पष्टीकरण मागवून योग्य ती कारवाई करतील असा दावा केला जात आहे.

तानाजी सावंत यांनी दोन दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसण्याची वेळ आल्यामुळे आम्हाला अक्षरशः उलट्या होतात असे विधान केले. आम्ही हाडामासाचे शिवसैनिक आहोत. त्यामुळे माझे काँग्रेस व राष्ट्रवादीसोबत केव्हाच जमले नाही. यामुळे कॅबिनेटच्या बैठकीत राष्ट्रवादीच्या मांडीला मांडी लावून बसत असल्यामुळे आम्हाला उलट्या होतात. कारण आम्ही आमच्या तत्वांशी बांधील आहोत, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानामुळे महायुतीच्या गोटात एकच खळबळ माजली होती.



**नांदेड जिल्हाचे खासदार कै.वसंतराव बळवंतराव पाटील चव्हाण यांच्या निवासस्थानी जाऊन प्रा.रविंद्र पाटील चव्हाण साहेब यांची समाज उन्नती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मारोतीराव पाटील घोरबांड साहेब, सेवानिवृत्त शिक्षक बापुराव गायकवाड सर, भाऊसाहेब पाटील पानपट्टे सर यांनी सांत्वन पर भेट घेतली.**

## शशिकांत इरवंतराव कदम प्रदिर्घ सेवेनंतर झाले सेवानिवृत्त



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

सिरसी खुर्द ता.कंधार येथील कै.इरवंतराव लक्ष्मणराव पाटील कदम यांचे सुपुत्र आणि रणजित पाटील कदम,संभाजी पाटील कदम, ॲड विनायक पाटील कदम, लक्ष्मण पाटील कदम यांचे लहान बंधू आहेत ते हडोळती ता.अहमदपूर येथील दयानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील मराठी विषयाचे शिक्षक श्री शशिकांत इरवंतराव कदम हे प्रदीर्घ सेवेनंतर दि.३१ ऑगस्ट २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवा काळ ३२ वर्ष ०२ महिने २१ दिवस झाला आहे.ते एक उपक्रमशील शिक्षक म्हणून प्रसिद्ध होते. आदर्श शिक्षक, अभ्यासू, वैचारिक व्यक्तिमत्त्व ,पुरोगामी विचाराचे,पालकांशी सतत संपर्क संवाद साधणारे ,शाळेचा नावलौकिक वाढविण्यासाठी सतत धडपडणारे, कोरोना काळात शाळा बंद असताना विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने ज्ञानदान देण्याचे त्यांचे कार्य चालूच होते. सदरील कोरोना काळात महाराष्ट्र मराठी अध्यापक आंतरजाल उपक्रमामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.२०२० मध्ये त्यांना महात्मा ज्योतिबा फुले जिल्हास्तरीय शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले होते.ते एक विद्यार्थी व पालक प्रिय व शिस्तप्रिय शिक्षक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांच्या सेवा निवृत्तीच्या पुढील आयुष्यासाठी संस्थाध्यक्ष प्रा.पी.टी.पवार सर, सचिव डॉक्टर निलेश भैय्या पवार ,प्राचार्य कौडगावे जी.व्ही., माजी प्राचार्य व्यंकटराव मुळके, माजी प्राचार्य नरवडे पी.एस., माजी प्राचार्य जोगदंड आय. एम., शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### लोहा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत

## संजय गांधी उच्च माध्यमिक विद्यालय कलंबर चे घवघवीत यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत संजय गांधी उच्च माध्यमिक विद्यालय कलंबर ता.लोहा जि. नांदेड यांच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे ,लोहा येथे चालू असलेल्या तालुकास्तरीय अँथलेटिक्स क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी विजय संपादन केला आहे .त्यामध्ये २०० मीटर धावणे १९ वर्षाखालील वयोगट मुली अंकिता सिद्धार्थ सोनसळे प्रथम, गीता भिमसिंह गुणावत तृतीय, १०० मीटर धावणे १९ वर्षे वयोगट मुलींमध्ये खुशी साईनाथसिंह कच्छवे तृतीय, १५०० मीटर धावणे १७ वर्षाखालील गट मुले संगमेश्वर निवृत्ती भोकरे प्रथम, १५०० मीटर धावणे १९ वर्षाखालील वयोगट मुले समर्थ संजय आचणे प्रथम ,३००० मीटर धावणे १९ वर्षाखालील वयोगट मुले यशराज रघुनाथ नारनाळे तृतीय, लांब उडी १७ वर्षाखालील



वयोगट मुले राजेसाहेब शादुल शेख द्वितीय ,लांब उडी १९ वर्षाखालील वयोगट मुले समर्थ संजय नाचणे द्वितीय ,थाळीफेक १९ वर्षाखालील वयोगट मुली रूपाली विष्णू वाघमारे प्रथम, गोळा फेक १९ वर्षाखालील वयोगट मुली तनुजा शंकरराव भुत्तेवाड प्रथम ,४०० मीटर हर्डल्स १७ वर्षाखालील वयोगट मुले राजेसाब शादुल शेख द्वितीय ,४ ४०० रिले स्पर्धेत १९ वर्षाखालील वयोगट मुली प्रथम क्रमांक अंकिता सोनसळे, भाग्यश्री तेलंगे, वेदिका मलकापूरे , खुशी कच्छवे ,श्रेया गुंडे या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी यश संपादन केल्याबद्दल प्रशिक्षक प्रा.विनायक मुंडे ,प्रा.दिपक भालेराव,प्रा.दत्ता भुयारे यांचे व खेळाडूंचे समाज उन्नती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मारोतीराव निवृत्तीराव पाटील घोरबांड साहेब यांनी शुभेच्छा देऊन त्यांचा गौरव करून सत्कार केला आहे.यावेळी शाळेच्या शिक्षक,शिक्षिका, प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुस्लिम समाजातील मुलींच्या शिक्षणासाठी घेतला श्री केशव पाटील जंजाळ यांनी पुढाकार

### उर्दू शाळा धावडा,समता नगर,पारध,कठोरा बा.सिपोरा,दानापूर अशा ठिकाणी शिक्षकांची नेमणूक

**❝ श्री केशव पाटील जंजाळ यांच्या प्रयत्नाने भोकरदन तालुक्यामध्ये मिळाले १८ पैकी बारा शिक्षक दानापूर उर्दू मध्यम साठी एक नवीन शिक्षक मिळवून दिले व आता शाळे साठी नवी वर्ग ही मिळवून देईल आपले सर्वांचे माझ्या वर असेच प्रेम राहू द्या.नवी वर्गा साठी मी विशेष प्रयत्न करीन व नवीचा वर्ग आपल्याला मिळवून देईल.**

**लोकजागर संगटनेचे अध्यक्ष**
**केशव पाटील जंजाळ**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील दानापूर जिल्हा परिषद उर्दू मध्यम साठी केशव पाटील यांनी विशेष प्रयत्न करून उर्दू शाळे साठी एक नवीन शिक्षक मिळवून दिले. तसेच जिल्हा परिषद उर्दु माध्यम ला इयत्ता आठवीत सद्या पंधरा विद्यार्थी आहे व आजू बाजूच्या गावात पण उर्दू माध्यम ला विद्यार्थी शिकत आहे मात्र आठवी झाल्यानंतर त्यांना नवी व दहावी वर्गासाठी भोकरदन गाठावे लागते



त्यासाठी केशव पाटील जंजाळ यांनी शालेय समिती व शाळेला आश्वासन दिले आहे की नवी वर्ग लवकरात लवकर दानापूर उर्दू शाळे साठी मिळवून देईल.त्या बद्दल शालेय समिती अध्यक्ष रईस शेख व माजी अध्यक्ष शेख जुबेर यांनी लोकजागर संघटनेचे अध्यक्ष केशव पाटील जंजाळ यांचे हार व पुष्प गुच्छ देऊन शाळेच्या वतीने सत्कार केले.मात्र या वेळी ग्रामसेवक संजय पाजगे,माजी सरपंच भगवान दळवी, माजी सरपंच कठोरा बाजार अकत्तर रजा,तंटामुक्ती अध्यक्ष मस्तान शाह,शालेय समिती अध्यक्ष रईस शेख,उपाध्यक्ष शेख हाजी,शेख जुबेर,शेख अजीम,शेख सलीम,साजिद रंगरेज मुख्याध्यापक, शेख खुदुस,हुमेरा खान बाजी,गोविंद दळवी,नाहीद बाजी शेख,शेख बुशरा नवीन रुजू झाले.

**❝ केशव पाटील जंजाळ हे शाळे साठी असो किंवा शेतकऱ्यांच्या समस्या साठी असो प्रत्येक वेळी यांनी आपल्या संगटने मार्फत प्रश्न सोडवलेले आहे.शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते मात्र केशव पाटील यांच्या प्रयत्ना तुन आम्हला नवीन शिक्षक मिळाले.जिल्हा परिषद शाळेसाठी नवीन नवी चा ही वर्ग मिळवून देणार आहे.त्या बद्दल त्यांचे धन्यवाद.**

**माजी शालेय अध्यक्ष ,शेख जुबेर**

# महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे ८ वे राज्यस्तरीय अधिवेशन व आभार मेळावा नागपूर येथे संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

माननीय उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री माननीय श्री देवेंद्रजी फडवणीस साहेब , चंद्रशेखरजी बावनकुळे प्रदेशाध्यक्ष भारतीय जनता पार्टी ,आमदार डॉ परिणय फुके महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलिस पाटील संघाचे राज्याध्यक्ष माननीय बाळासाहेब शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राहिलेल्या मागण्या मान्य करण्यासाठी आणि मानधन वाढ केल्याबद्दल आभार व्यक्त करण्यासाठी हे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते याप्रसंगी माननीय उपमुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडवणीस साहेब यांनी वय ६० वरून ६५ करणे २) पोलीस पाटलाला पेन्शन लागू करणे ३) नूतनीकरण कायमचे





बंद करणे ४) पोलीस पाटीलांच्या कुटुंबाला आरोग्य विमा लागू करणे आणि पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यांनी पोलीस पाटलांना मान सन्मानीत करावे. व प्रलंबित मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले नांदेड जिल्हातील पदाधिकारी सर्व तालुका अध्यक्ष , जिल्हाध्यक्ष भास्कर कंकाळ. तालुकाध्यक्ष शिवशंकर सिरमेवार, तालुका सचिव. बालासाहेब तिमाजी सूर्यवंशी. भारत पाटील कदम उपाध्यक्ष ,शिवाजी घंटलवाड, शिवाजी संभाजी सोनटक्के. दिलीप पुरबाजीराव कदम ,संजय दत्तात्रेय यनावार , अशोक नरहरी भोरगे ,अर्जुन किशन मोगमपल्ले, चांदु पाटील ,किशन पाटील कदम ,महिला आघाडी. सौ सुनीता व्यंकटी आवातिरक ,सौ. अरुणा गजानन ठोके ,सौ. महानंदा तुकाराम येलगंदवार आशा मोतीराम संगेकर व नांदेड जिल्ह्यातील. बहुसंख्येने पोलिस पाटील महिला व बंधु उपस्थित होते .

# यंदाचा शेतकरी राजांचा बैल पोळा आनंदात होणार साजरा

## कंधार शहरात शिंगाराच्या साहित्याची दुकाने थाटली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

यंदाच्या पावसाळ्यात कंधार तालुक्यातील शेतकऱ्यांची पाऊस-पाणी बरसल्याने शेतकरी राजांची परिस्थिती समाधानी झाली आहे,त्यामुळे बैल-पोळा आनंदात साजरा करतांना सर्वसामान्य शेतकरी वर्ग जाम खुष आहे.बैलाचा साज विकणाऱ्या व्यापाऱ्यांनी आपली शिंगाराचे साहित्य विक्रीची दुकाने थाटली आहेत.

बैलपोळा हा श्रावण अमावस्या या तिथीला साजरा करण्यात येणारा पोळा हा मोठा सण देशभरात साजरा केला जातो,

पूर्वीच्या काळी प्रत्येकांच्या शेतातील मशागतीची कामे ही बैल-जोडीच्या साह्यानेच केली जात होती.शेतातील पिकलेले धान्य वाहून आणण्यासाठी बैल-जोडीचा वापर सरास



होत असे; मात्र सध्या आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालणारे प्रगत अवजारे वापरून कमी वेळात जलद कामे ट्रॅक्टरच्या साहाय्याने होत आहेत.सध्या बाजारा मध्येही सर्जा-राजाला सजविण्यासाठी सजावटीचे साहित्य उपलब्ध झाले आहे; परंतु बोटांवर मोजण्या इतक्या शेतकऱ्यांकडे बैल-जोडी पाहायला मिळत असल्याने मोजकेच शेतकरी खरेदी- विक्री करताना दिसत आहेत.काही काळानंतर हा आपला सर्जा-राजा लुप्त होणार की काय ? असा प्रश्न ही सर्व सामान्य जनतेतून बोलले जात आहे,पोळा सण अवघ्या आठ दिवसांवर येऊन ठेपला असून, बाजार आता पासूनच सजला आहे; असल्याने बाजारपेठेवर मोठा परिणाम दिसत आहे.यंदा पाऊस भरपूर पडत असल्याने शेतकरी आनंदात आहे. नदी-नाले दुथडीने वाहत असल्याने बैलांना अंघोळ घालण्यासाठी नदी-नाले टच्च भरली असल्यामुळेच बैलांना अंघोळ घालण्याची मज्ज यंदा घेता येईल.

### बैलांची संख्या घटली

**२०१२ च्या पशुजनगणनेनुसार बैलांची संख्या ही २०१९ च्या पशू जनगणनेनुसार सात वर्षांत घटली आहे.तर नव्याने पशू जनगणना झाल्यास हा आकडा आणखी कमी होण्याची शक्यता आहे.शेती करण्यासाठी आता बैलांचा पूर्वीसारखा वापर होत नाही.तंत्रज्ञान अवगत झाल्याने बैलांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालल्याचे चित्र दिसत आहे.**

# चॉकलेट चोरीच्या संशयावरून ८ वर्षीय मुलास झाडाला दीड तास बांधून ठेवले

## केज तालुक्यातील घटना, महिला किराणा दुकानदारासह तिघांवर अट्रॉसिटी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

शाळा सुटल्यानंतर घराकडे निघालेल्या तिसरीच्या आठवर्षीय विद्यार्थ्यास किराणा दुकानदाराने चॉकलेट चोरल्याच्या संशयातून कपड्याने झाडाला दीड तास बांधून ठेवले. येवता (ता. केज) येथे ही घटना घडली. याप्रकरणी तिघांविरुद्ध ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला.

केज तालुक्यातील येवता येथे जिल्हा परिषद शाळेत इयत्ता तिसरीच्या वर्गात शिकणारा बाळू संतोष गायकवाड हा बालक २९ ऑगस्ट रोजी मधल्या सुटीत घरी येत होता. या बालकास गावातील एक किराणा दुकानदार कविता जोगदंड

या महिलेने चॉकलेट चोरल्याच्या संशयावरून घरासमोर असलेल्या प्राजक्ताच्या झाडाच्या खोडाला बांधले. त्यामुळे बालक घाबरून रडू लागले. या वेळी बालकाने पाण्याची

मागणीही केली होती , मात्र महिलेने त्याला पाणी दिले नाही. दरम्यान, दुपारच्या सुटीत मुलगा घरी न



आल्याने त्याच्या आईने मुलाचा शोध घेतला. त्यानंतर हा प्रकार निदर्शनास आला. या घटनेमुळे मुलगा घाबरल्याने त्याच्यावर केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर मुलास बांधून का ठेवले, अशी विचारणा केली असता बालकाच्या आईला कविता जोगदंड, त्यांचे पती पांडुरंग जोगदंड, मुलगा गोपाळ जोगदंड या तिघांनी शिवीगाळ केली. याप्रकरणी संतोष गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तिघांविरुद्ध ॲट्रॉसिटीसह इतर कलमान्वये गुन्हा दाखल झाला.

## उमरखेड आगाराने घेतली महिला सुरक्षेतेची जवाबदारी

# कर्तव्यदक्ष आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके यांनी वेळीच निर्णय घेतल्याने महिलांनी केले स्वागत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

उमरखेड आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके ह्या वैयक्तिक कारणास्तव रजे वर होत्या. मात्र रात्री २२.३० वाजता सुरक्षा रक्षक श्री गावंडे यांना फोन कॉल करून आगाराच्या परिसर व कामकाजा बाबत विचारणा केली असता, श्री गावंडे यांनी शिवपुराण कार्यक्रम वरून ढाणकी येथे जाणाऱ्या महिला बसस्थानकवर असल्याचे सांगितले असता आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके यांनी अधिंस्त कर्मचारी यांना फोनवर सूचना देवून वेळ न वाया घालवता स्वतः च वाहन परीक्षक म्हणून कामकाज करणारे चालक श्री गजानन नंदनवार व वाहक श्री एस कदम यांना सूचना



देवून महिलांना त्यांच्या गावाला गाडी सोडायला सांगितली.

या दरम्यान गाडी व मशीन घ्यायला वेळ लागणार होता तसेच पाऊस सुरू होता तेव्हा आगार व्यवस्थापक यांनी सुरक्षा रक्षक यांना बसस्थानकवर महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बसस्थानकवर थांबायला सांगितले.

आज ठीक ठिकाणी महीला असुरक्षित असल्याचे दिसून येते परंतु उमरखेड आगाराने राखीच्या पर्वावर महिलांना रात्री त्यांच्या गावी सुरक्षित सोडून माणुसकीचे दर्शन घडविले व रा प महामंडळ हे प्रवाशांच्याच सेवेसाठी आहे. हे वाक्य खर करून महिलांना खऱ्या अर्थाने राखीची ओवाळणी दिली. या बाबत महिलेने चालक वाहक यांचे आभार मानले. कर्तव्यदक्ष आगार व्यवस्थापक प्रमोदिनी किनाके यांच्या पुढाकाराने या महिला सुखरूप आपल्या गावी पोहोचले याबद्दल किनाके मॅडम यांची सर्व स्तरावरून कौतुकास्पद कामगिरीबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होताना दिसत आहे.

# पिंपरी दुमाला शाळेत शिक्षण परिषद उपक्रम संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या सूचनेनुसार बालकांची सुरक्षितता व पालक,शिक्षक यांची जबाबदारी याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कोंढापुरी केंद्रातील सर्व शिक्षकांची शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरी दुमाला येथे उत्साहात पार पडली.

सध्या समाजामध्ये बालकांच्या सुरक्षिततेबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे,या पार्श्वभूमीवर संपूर्ण पुणे जिल्ह्यामध्ये अशा परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने पोस्को कायदा जागृती ,सखी सावित्री समितीची रचना व कार्य आणि त्या अनुषंगाने पालक व शिक्षक यांची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.




या शिक्षण परिषदेसाठी केंद्रप्रमुख यशवंत रणदिवे, सरपंच महेंद्र डोळस,पोलीस पाटील संतोष जाधव, शाळा समिती अध्यक्ष शशिकांत चिखले, उपाध्यक्ष वर्षा खळदकर,तेजश्री चिखले यांनी मार्गदर्शन केले.

उपस्थित शिक्षकांना सुलभक म्हणून उत्तम होलगुंडे, वर्षा नऱ्हे, सुकन्या धुमाळ यांनी काम पाहिले.

शिक्षण परिषद यशस्वी होण्यासाठी शालेय समिती सदस्य विशाल खळदकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली, त्याबद्दल सर्व शिक्षकांनी त्यांचे आभार व्यक्त केले. शिष्यवृत्ती तज्ञ शिक्षिका सुकन्या धुमाळ यांनी याप्रसंगी शालेय उपक्रमासाठी आर्थिक स्वरूपात मदत दिली.शिक्षण परिषदेचे सूत्रसंचालन कांताराम शिंदे यांनी केले.मुख्याध्यापक राहुल चातुर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनच्या अध्यक्षांची गावंडे महाविद्यालयास भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य, राज्यमंत्री दर्जाचे अध्यक्ष ड. निलेश केशवराव हेलोंडे पाटील यांनी नुकतीच येथील गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयास भेट दिली आणि शेतकऱ्यांच्या पाल्यांसाठी ग्रंथालयातील पुस्तके व अभ्यासिका उपलब्ध करून देण्याबाबत प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांच्याशी चर्चा केली.

शेतकऱ्यांचे पाल्य आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना शैक्षणिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनवण्यासाठी विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सत्र संपल्यानंतर रोजगार मिळवण्यासाठी त्यांना विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे लागते. स्पर्धा परीक्षांना सामोरे जात असताना त्यांना स्पर्धा परीक्षेबाबत फारशी माहिती नसते. तसेच त्यांच्याकडे



स्पर्धा परीक्षेची पुस्तके, वर्तमानपत्रे, नियतकालिके इ. खरेदी करण्याची क्षमता नसते. पर्यायाने अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांकडे पाठ फिरवतात. आपल्या पाल्यांना शिकवण्याची क्षमता नसल्याने या विद्यार्थ्यांचे पालक कर्जबाजारी होऊन हताश होऊन शेवटी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. शेतकरी आत्महत्यांमागे हेही एक कारण आहे. अशा विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य, अमरावती यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सहकार्याने एक नावीन्यपूर्ण आणि सकारात्मक उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्यातील एका महाविद्यालयाचे ग्रंथालय व अभ्यासिकेचा उपयोग त्या तालुक्यातील सर्व विद्यार्थी घेतील.

या उपक्रमाला सुरुवात करण्यासाठी व चालना देण्यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य, राज्यमंत्री दर्जाचे अध्यक्ष ड. निलेश केशवराव हेलोंडे पाटील यांनी महाविद्यालयास भेट देऊन ग्रंथालयाची पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले. याप्रसंगी यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी सदस्य चितांगराव कदम, उमरखेडचे तहसीलदार सुरडकर, उपप्राचार्य प्रा. डॉ. व्ही. पी. कदम, प्रो. डॉ. डी. व्ही. तायडे हेही उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांनी ग्रंथालयासाठी आणखी स्पर्धात्मक परीक्षांची पुस्तके पाहिजे, ती तहसीलदार साहेबांच्या माध्यमातून उपलब्ध झाली तर तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांना या पुस्तकांचा फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. या उपक्रमाच्या अंमलबजावणीनंतर तालुक्यातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील स्पर्धा परीक्षांची पुस्तके आणि अभ्यासिकेचा फायदा होईल,

अशी माहिती त्यांनी दिली. यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'गाव तिथे अधिकारी' हा उपक्रम सुरू आहे. संस्थेच्यावतीने स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकाही सुरू झाल्या आहेत, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904